| MHJN020005162014 | विशेष दिवाणी दावा क्र.४१/२०१३<br>भारत नेवासेकर वि. मनिष अब्बासी व इतर<br>CNRMHJN020005162013 |
| --- | --- |

## निशाणी क्रमांक ८६ वरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.६ तर्फे तिचे विरुध्द वादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश बाजूला होवून तिस वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

दाव्यातील प्रतिवादी क्र.६ हिस अर्धांगवायूचा आजार असल्याने बरेच दिवस न्यायालयात येवून प्रकरणाची चौकशी करु शकली नाही. तसेच, वकीलांशी संपर्क करु शकली नाही. प्रतिवादी क्र.६ हिने नवीन वकील नेमून मुखत्यारआधारे सदर अर्ज दिला आहे. प्रतिवादी क्र.६ अर्धांगवायूने आजारी असल्याकारणाने प्रतिवादीचे विरुध्द वादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्द होवून प्रतिवादी क्र.६ हिस वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळणेकामी प्रतिज्ञापुर्वक दिला आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) वादीतर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. अर्जातील सर्व विरोधी कथने वादीने नाकारली आहे. प्रतिवादींनी वैद्यकीय उपचाराची कागदपत्रे दाखल केलेली नाही. दाव्याचे कामकाजास विलंब होण्याकरिता सदरचा अर्ज दिला आहे. वादी औरंगाबाद येथे राहत असून त्यास प्रकरणात हजर राहणे व जाणे–येणेसाठी खर्च होत आहे.

त्यामुळे त्यामुळे अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

४) प्रतिवादी क्र.६ व वादीतर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) सदरच्या अर्जानुसार प्रतिवादी क्र.६ करिता तिचे गैरहजेरी कारणास्तव वादीचा उलटतपास नाही असा आदेश दिनांक २७/०६/२०१९ रोजी झाला आहे. प्रतिवादी क्र.६ अर्धांगवायूच्या आजाराने बरेच दिवस न्यायालयात येऊन चौकशी करु शकली नाही. तसेच, वकीलांशी संपर्क करु शकली नाही. प्रतिवादी क्र.६ या आजारपणामुळे व गैरहजेरी कारणास्तव तिचे विरुध्द वादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश बाजूला होणे आवश्यक व गरजेचे असल्याचे प्रतिवादी क्र.६ तर्फे सुविद्य वकीलांनी स्पष्ट केले आहे. परंतु, वादीतर्फे अर्जास विरोध दर्शविताना आजारपणाची उपचाराची कागदपत्रे दाखल केलेली नाही. तसेच, दाव्याचे कामकाज विलंब होण्याकरिता सदर अर्ज दिल्याने तो खर्चासह रद्द करण्याची मागणी वादीने केली आहे.

६) दाव्याचा अभिलेखानुसार वादीचा प्रतिवादी क्र.६ तर्फे उलटतपासाकामी दावा नेमलेला असताना प्रतिवादी क्र.६ चे गैरहजेरी कारणास्तव प्रतिवादी क्र.६ करिता वादीचा उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे. सदरचा आदेश बाजूला होऊन मिळणेकरिता अर्जात नमूद केलेल्या कारणांचे पुष्ठयर्थ प्रतिवादी क्र.६ ची आजारपणाबद्दलची वैद्यकीय उपचाराची कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. तथापि, दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकामी वादीचा प्रतिवादी क्र.६ करिता उलटतपास होणे आवश्यक व गरजेचे आहे.

त्यासाठी केवळ संधी म्हणून प्रतिवादी क्र.६ ने वादीस खर्चापोटी रक्कम रुपये ५००/- देण्याचे अटीस अधिन राहून तिचेविरुध्द वादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश बाजूला करुन तिस वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. तसे झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादी क्र.६ चे निश्चितच नुकसान होणार आहे. यासाठी सदरचा अर्ज खर्चाच्या अटीस अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | अर्ज निशाणी क्र.८६ प्रतिवादी क्र.६ ने वादीस खर्चापोटी रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) देण्याच्या अटीस अधिन राहून मंजुर करण्यात येत आहे. |
| २ | परिणामतः प्रतिवादी क्र.६ ने खर्चाचे अटीची पुर्तता ताबडतोब केल्यानंतर तिचेविरुध्द वादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश बाजूला होऊन प्रतिवादी क्र.६ हिस वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NANDAKUMAR LAXMAN YEOLEKAR
Date: 2022.07.05 16:48:41 +0530

(एन. एल. येवलेकर)

दिनांकः ०५/०७/२०२२

दिवाणी न्यायाधीश व.स्तर

जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना

दिनांक : ०५/०७/२०२२

सही/-

एम. डी. आढे

लघुलेखक (ग्रेड-३)